वासुदेव मेघश्याम निखार्गे वि.
अनंत पुंडलिक निखार्गे व.२४

## निशाणी क्रमांक ७९ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२ विरूध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ श्री. अनिल पुंडलिक निखार्गे हे दिनांक ०६/०५/२०२१ रोजी गांव मौजे आजगांव, ता. सावंतवाडी येथे मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ हे मयत झालेनंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या मृत्यूचा दाखला वेळीच उपलब्ध न झाल्यामुळे प्रस्तुत दाव्याचे कामी त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत सामील करता आलेले नाहीत. प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत सामील न करण्यामागे वादींचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.२ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. २ विरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. २(अ) ते २(क) यांनी म्हणणे दाखल केलेले नाही, परंतु प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला आहे.

५. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे व दावा इमल्याचे सरस निरस मानाने धडेवाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. प्रतिवादीविरूध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. परंतु, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी

क्र.२ अनिल पुंडलिक निखार्गे यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतक्या खर्चाने मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादीविरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND Date: 2024.08.22 18:08:52 +0530

दिनांक- २२/०८/२०२४ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.